**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 25.01.2026** **वार- रविवार**

---

**<u>शौर्यपुरस्कार</u>**

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला, आज संध्याकाळी 7 वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार आहेत. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस, अग्निशमन दल, होमगार्ड, नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवांमधील 982 कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर करण्यात आली. यात महाराष्ट्रातील 89 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. राज्यातल्या 31 पोलीस कर्मचा-यांना  शौर्य पदक, तर 6 जणांना 'राष्ट्रपती पदक' जाहीर झालं आहे. अन्य शौर्य पदकांमध्ये पोलीस सेवेतील 40, अग्निशमन सेवेसाठी 4, गृहरक्षक दलातील 3 आणि सुधारात्मक सेवेतील 5 कर्मचाऱ्यांना पदकं जाहीर करण्यात आली आहेत.**

**<u>मतदारदिन</u>**

**राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज पुण्यात विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार नोंदणी आणि निवडणूक प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना गौरवण्यात आलं. मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून ते प्रत्येक नागरिकाचं महत्त्वाचं कर्तव्य आहे. युवकांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन लोकशाही मूल्यांची जपणूक करावी असं आवाहन अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी यावेळी केलं. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात चित्र प्रदर्शनही भरवण्यात आलं आहे.**

**पुणे इंटरनॅशनल स्कूलमध्ये युवा नेत्या रेणुका चलवादी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या मतदानाच्या हक्काचा नागरिकांनी योग्य आणि जबाबदारीने वापर केला, तर निश्चितच योग्य प्रतिनिधी निवडून येऊ शकतात आणि त्यातून लोकशाही अधिक बळकट होईल, असं प्रतिपादन रेणुका चलवादी यांनी यावेळी केलं.**

**पुण्यातील एरंडवणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानं राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आज कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी महानगरपालिका निवडणुकीमध्ये बिनविरोध सदस्य निवडून आल्याबद्दल निषेध नोंदवण्यात आला.**

मतदानयंत्र

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी मतदान यंत्रांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकीसाठी पुणे जिल्ह्यात 3 हजार 605 मतदान केंद्र आहेत. यासाठी 14 हजारांहून अधिक मतदान यंत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या निवडणुकीसाठी 5 फेबुवारी रोजी मतदान होणार आहे. महापालिका निवडणुकीतील अनुभव लक्षात घेता मतदानयंत्रे आणि कंट्रोल युनिट बंद पडल्यानंतर तातडीने नवीन यंत्र बदलण्यासाठी चारपट जास्त यंत्र उपलब्ध करून देण्यात आली असल्याचं उपजिल्हाधिकारी नामदेव टिळेकर यांनी सांगतिलं.

पीएमआरडीए

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 29 महत्त्वाच्या सेवा पूर्णपणे ऑनलाइन केल्या आहेत. या सेवांसाठी कोणताही ऑफलाइन अर्ज स्वीकारला जाणार नाही, असं परिपत्रक प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केलं आहे. त्यामुळे दाखले, परवानग्या आणि प्रमाणपत्रांसाठी आता नागरिकांना कार्यालयांचे हेलपाटे मारण्याची गरज उरलेली नाही.

मएसोक्रीडास्पर्धा

पुण्यात पार पडलेल्या 'मएसो क्रीडा करंडक 2026’ या राज्यस्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचं सर्वसाधारण विजेतेपद कळंबोली इथल्या मएसो ज्ञानमंदिर या शाळेने पटकवलं. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडावर्धिनी आणि बालशिक्षण मंदिर प्रशालेनं, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेचं हे 14वं वर्ष होतं. क्रिकेटपटू तेजल हसबनीस यांच्या हस्ते स्पर्धेचं बक्षीस वितरण झालं. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून क्रीडासंस्कृती रुजवण्यासाठी अशा स्पर्धा महत्वाच्या असतात, असं तेजल हसबनीस यावेळी म्हणाल्या.

बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने बटाटा, लसूण, शेवगा आणि टोमॅटोचे भाव उतरले. बहुतांश पालेभाज्यांचे भाव स्थिर आहे. फळबाजारात डाळिंब, मोसंबी, पेरू, बोरे आणि लिंबांच्या भावात वाढ झाली.

रथसप्तमी आणि प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर आज फूल बाजारात मोठ्या प्रमाणावर फुलांची आवक झाली. मागणी वाढल्याने जवळपास सर्वच फुलांचे भाव वधारले आहेत.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रावेत परिसरात जलवाहिनीच्या दुरुस्तीचं काम आज केलं जात आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील अनेक भागांमध्ये आज संध्याकाळचा पाणीपुरवठा होणार नाही, उद्याही कमी दाबाने पाणीपुरवठा होऊ शकतो असं शहर सहअभियंता अजय सुर्यवंशी यांनी कळवलं आहे.

रेल्वे

पुणे रेल्वे स्थानकात येणारी हुजुरसाहिब नांदेड पुणे एक्सप्रेस आता पुण्याऐवजी हडपसर रेल्वे स्थानकावर येणार आहे. उद्यापासून ही गाडी पुणे स्थानकातून हडपसर स्थानकात स्थलांतरित करण्यात आल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 13 पूर्णांक 2 दशांश अंश; तर कमाल तापमान 29 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या कमाल तापमानात किंचित वाढ होईल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**